**नियमीत दिवाणी दावा क्र. ४२/२०११ मध्ये नि. १४८ वरील आदेश**
**( दिनांक १९ डिसेंबर, २०२५ )**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दाव्यामध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे.

०२. वादी यांचे असे कथन आहे की, दावा कलम ४ मध्ये नजर चुकीने दावा मिळकतीबाबत टायपिंग करताना चुकीची दिशा टाईप झाली आहे. दावा कलम १अ मध्ये वर्णन पाहता कलम ४ मधील दावा मिळकतीचे वर्णन दुरुस्त करणे गरजेचे आहे. सदरची दुरुस्ती ही वस्तुस्थितीचा तांत्रीक दोष राहु नये याकरीता करणे गरजचे आहे. सदर दुरुस्तीने दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही अगर प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादी यांचे पुढे असे कथन आहे की, वादी यांनी यापुर्वी निशाणी क्र.४४ ला तशी दुरुस्ती करण्याचा अर्ज दिला होता. परंतु, अर्जाचे पुष्ठयर्थ दिलेले प्रतिज्ञापत्र हे दावा पाहुन तयार केल्यामुळे क्रम चुकीचा झाल्याने न्यायलयाने सदरचा अर्ज रद्द केला होता. सबब, वादी यांनी प्रस्तुत अर्जात नमुद केलेला मजकुराबाबत दुरुस्ती करणेची विंनती केली.

०३. वादी यांचे पुढे असे कथन आहे की, मागितेल्या दुरुस्त्या या तांत्रीक स्वरुपाची असुन केवळ दाव्यात मिळकतीचे स्पष्टीकरण येणार आहे. सदरच्या दुरुस्तीने प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे, वादी यांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

०४. प्रतिवादी क्र. ६ व ७ यांनी निशाणी क्र. १५१ वर त्यांचे म्हणणे देवुन अर्ज मंजुर करणेस विरोध केला आहे. प्रतिवादी क्र. ६ व ७ यांचे असे कथन आहे की, वादी यांनी दावा दाखल करुन १३ वर्षापेक्षा अधिक काळ उलटला आहे. वादी यांना केवळ दाव्यामध्ये यश येणार नाही याची खात्री झाल्याने केवळ दाव्याचे कामकाज लांबविण्याच्या हेतुने व प्रतिवादींना मानसिक त्रास व आर्थीक खर्चात टाकण्यासाठी प्रस्तुत अर्ज दिला आहे. वादी यांनी दि. २०.०७.२०२२ रोजी निशाणी क्र. ११९ ला शपथेवर जबाब नोंदवला आहे. त्यामुळे सदरची दुरुस्ती मंजुर झाल्यास दाव्याच्या स्वरुपात बदल होवुन वर्णनात निश्चीत बदल होणार आहे. तसेच वादी यांनी सरतपास दाखल केल्यानंतर नि. क्र. १४४ ला अशाच प्रकारचा दावा दुरुस्तीचा अर्ज दिला होता. तो न्यायालयाने चौकशीअंती नामंजुर केला आहे. त्यामुळे, वादीला पुन्हा त्याच कारणासाठी नव्याने दावा दुरुस्तीची मागणी करता येणार नाही. वादी यांनी निशाणी क्र. १४४ च्या आदेशावर वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल केलेले नाही. दुरुस्ती मंजुर झालेस पुन्हा नव्याने दाव्याचे काम चालु होणार आहे. यदाकदाचित अर्ज मंजुर करणेचे झाल्यास प्रतिवादींना र.रु. १०,०००/- इतका वादखर्च देणेचा आदेश व्हावा अशी विनंती केली.

०५. वादी व प्रतिवादी यांचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

०६. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द दाव्याच्या अनुषंगाने जाहीर ठराव व दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटपाकरीता दाखल केला आहे. वादी यांनी

प्रस्तुत अर्जामध्ये जी दुरुस्ती मागितली आहे ती दावा मिळकतीच्या दिशांच्या अनुषंगाने असल्याचे दिसुन येते. वादीच्या मते सदरच्या चुका या टंकलेखन करताना झाल्या आहेत व सदरच्या दुरुस्त्या या तांत्रीक स्वरुपाच्या आहेत.

०७. प्रस्तुत दाव्यात वादीने दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप होवुन मिळणेची मागणी केली आहे. तसेच प्रस्तुतचा दावा हा स्थावर मालमत्तेविषयी असल्याने मालमत्तेच्या अनुषंगाने संबधीत असलेल्या सर्व पक्षकारांचे मिळकतीविषयी असलेले अधिकार व हक्क ठरवण्याच्या दृष्टीने, त्याचबरोबर प्रस्तुत दुरुस्ती दोन्ही पक्षांमधील वादातील खरा प्रश्न निश्चित करण्यासाठी आणि दाव्याचा निष्पक्ष निर्णय घेण्यासाठी सदरची दुरुस्ती आवश्यक असल्याचे दिसुन येते.

०८. उपरोक्त चर्चेअंती असे दिसुन येते की, वादी यांनी मागितलेली दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत असल्याचे दिसुन येत नाही. प्रस्तुत दुरुस्ती अर्ज मंजुर केल्यास सदरच्या दुरुस्तीने प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होण्याची शक्यता दिसुन येत नाही. तसेच, सदर दुरुस्तीच्या अनुषंगाने प्रतिवादीला त्याचे म्हणणे दाखल करण्याची व त्या अनुषंगाने वादी व वादी साक्षीदारांचा उलटतपास घेण्याची संधी मिळणारच आहे. त्यामुळे, प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होण्याची शक्यता नाही. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप, दाव्याची सद्यस्थिती व उभय पक्षकारांची कथने विचारात घेता, प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. परंतु, वादी यांनी जवळ जवळ १३ वर्षानंतर दावा मिळकतीच्या चुकलेल्या दिशांबाबत जी दरुस्ती मागितली आहे, त्यामुळे,

प्रतिवादीचा जलद दावा चालवण्याच्या हक्काला बाधा पोहचली आहे. त्यामुळे, वादीचा अर्ज मंजुर करताना प्रतिवादी यांना या अर्जाचा वादखर्च देणे न्यायोचीत ठरते. सबब, मी खालील आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१. वादीचा नि.क्र. १४८ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे. वादी यांनी या अर्जाचा वादखर्च म्हणुन रक्कम रुपये २०००/-(र.रु. दोन हजार रुपये फक्त) प्रतिवादी यांना देणेचे आहेत.

२. वादी यांनी आदेशाच्या दिनांकापासुन १४ दिवसाच्या आत दाव्यामध्ये दुरूस्ती करावी. जर सदरची दुरुस्ती उपरोक्त कालावधीत न केल्यास सदरचा अर्ज नामंजूर करण्यात आल्याचे समजावे.

३. वादी यांनी दावा दुरूस्तीची प्रत दाखल करावी.

Digitally signed by VIKRAM AMBADAS AVHAD
Date: 2025.12.19 18:12:31 +0530

**स्थळ** : मेढा (डॉ. विक्रम अं. आव्हाड)

**दिनांक** : १९.१२.२०२५ **दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,मेढा**